महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र. ०२२-२२८७१४९६ Email ID : deskf12.rnf@maharashtra.gov.in

क्र.: एस-३०/२०२३/प्र.क्र.१२९/वने-१२ दि. ०५/०१/२०२६.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक,
(वन बल प्रमुख),
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

विषय :- मुळ अर्ज क्रमांक ८२०/२०२३ तसेच मुळ अर्ज क्र.१३९५/२०२३ मध्ये मा. न्यायाधिकरणाने दि.२६/०२/२०२४ रोजी दिलेल्या **आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्र.११९०८/२०२४ मधील मा. उच्च न्यायालयाच्या दि.२१/०४/२०२५ च्या आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत**
श्री.सचिन कचरू डोईफोडे व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर

संदर्भ :- आपले पत्र क्र.कक्ष-३१/विधी/प्र.क्र.१६२/२३-२४/४४२/२५-२६, दि.०३/०७/२०२५.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, अर्जदार श्री. सचिन डोईफोडे व इतर ५ यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेल्या विषयांकीत मुळ अर्जामध्ये दि.२६/०२/२०२४ रोजी झालेल्या अंतिम निर्णयानुसार संबंधित अर्जदारांना वन विभागातील गट-क व गट-ड पदाच्या भरतीप्रक्रियेत शासन निर्णय दि.१६/१०/२०१२ मधील परिच्छेद क्र.८ येथील तरतुदीनुसार समांतर आरक्षणाचा लाभ मिळण्याचा कायदेशीर हक्क असल्याचे, आदेशित केले आहे. मा.न्यायाधिकरणाच्या उपरोक्त दि.२६/०२/२०२४ च्या आदेशाविरुध्द शासनाने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्र.११९०८/२०२४ व अंतरिम अर्ज क्र.६७९७/२०२५ मधील दि.२१/०४/२०२५ च्या अंतिम निर्णयान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मा.न्यायाधिकरणाचे सदर दि.२६/०२/२०२४ चे आदेश कायम केले आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या दि.२१/०४/२०२५ च्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल करणे योग्य होणार नाही, असे अभिमत विधी व न्याय विभागाने अलिकडेच दिले आहे. त्यामुळे मा.न्यायाधिकरणाच्या दि.२६/०२/२०२४ च्या आदेशाची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त ठरत आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर करावा.

अ) आपल्या कार्यालयाचे क्र.कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.६(क)/८९६/१३-१४, दि.३१/०८/२०१३ चे परिपत्रक हे संविधानाच्या अनुच्छेद क्रमांक १६ मधील तरतुदीचे उल्लंघन करणारे व भेदभावपुर्ण असल्याचे निरीक्षण मा.न्यायाधिकरण मुंबई यांच्या दि.२६/०२/२०२४ च्या आदेशातील परिच्छेद क्र.२२ अन्वये नोंदविले आहे. त्यामुळे सदर परिपत्रक रद्द करावे.

आ) मा.न्यायाधिकरणाच्या दि.२६/०२/२०२४ च्या आदेशाच्या अंमलबजावणीच्या परिणामी सर्वश्री. डोईफोडे व इतर ५ यांना वनरक्षक गट-क पदाच्या भरतीप्रक्रियेसाठी पात्रतेनुसार (पात्र ठरल्यास) शासन सेवेत नियुक्ती देणेबाबत कार्यवाही करावी.

इ) शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील परिच्छेद क्र.८ (ड) मधील आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता पुर्तता करीत असलेल्या अटी ह्या सदर शासन निर्णयातील परिच्छेद-१ ते परिच्छेद-७ मधील रोजंदारी मजूरांना नियमित करण्याबाबतच्या तरतुदींशी निगडीत आहे किंवा कसे, त्याबाबत सुधारणा करण्याबाबतचा सविस्तर परिपूर्ण प्रस्ताव आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास सादर करावा.

आपली,

(मंजुषा सोनजे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत

१) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.
२) विभागीय वन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
३) उपवनसंरक्षक (वाईल्ड लाईफ), पुणे.
४) निवडनस्ती (वने-१२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.